| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२१३१/२०१५ |
| सरकार वि. दिपा व एक |
| निशाणी क्र.२४ |

**<u>सरकारतर्फे साक्षदार क्र.२ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| नांव | : | – श्रीमती सरस्वती दिनकर वानखेडे |
| वय | : | – ३४ वर्ष |
| धंदा | : | – महिला पोलीस शिपाई ब.नं.१३०३२, पोलीस स्टेशन गणेशपेठ, नागपूर. |
| राहणार | : | – गिट्टीखदान, नागपूर. |

**<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.एम. दुंगे यांचेकडून</u>**

१. दिनांक २१.०५.२०१५ रोजी मी मुख्यालय येथे महिला पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी माझी लकडगंज ए.सी.पी. पथकात सकाळी ११.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यत गंगाजमुना परिसरात गस्त डयुटी होती. त्यावेळी माझ्यासोबत पी.एस.आय. राठोड व इतर पुरूष पोलीस कर्मचारी होते. त्यादिवशी सायंकाळी ७.३० वाजता गंगाजमुना परिसरातील गुडडूबाई गल्लीत एक महिला अश्लील इशारे व अंगप्रदर्शन करीत असतांना आढळली. पी.एस.आय. राठोड यांच्या आदेशाने त्या महिलेस मी व महिला पोलीस शिपाई सिमा राउत यांनी ताब्यात घेतले. त्या महिलेने तिचे नांव दिपा किसन धनावत असे सांगीतले. ती याकामी आरोपी क्र.१ आहे. ती आज हजर आहे. ती आग्रा येथील रहीवासी असून मुन्नीबाईच्या घरी किरायाने राहत होती. आरोपी क्र.१ ही वेश्या व्यवसाय करण्यासाठी अश्लील इशारे व अंगप्रदर्शन करीत होती. तिला लकडगंज पोलीस स्टेशनमध्ये आणले. तपासी अधिका–यांनी माझा जबाब नोंदवला होता.

**<u>उलट तपासणी आरोपींतर्फे वकील श्री. पात्रीकर यांच्यामार्फत</u>**

२. गंगाजमुना परिसर गजबजलेला आहे व त्याठिकाणी नेहमी लोकांची गर्दी असते, हे खरे आहे. त्या परिसरात पोलीस चौकी आहे, हे खरे आहे. मी घटनेवेळी

डयुटीवर नव्हते, हे खरे नाही. आरोपी क्र.१ हि अश्लील इशारे अगर अंगप्रदर्शन करीत नव्हती, हे खरे नाही. घटनेनंतर दुस-या दिवशी माझा जबाब नोंदवला. आरोपी क्र.१ ला मी पहिल्यांदा पाहत आहे, हे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे खरे नाही.

**उलटतपास संपला**
**फेरतपास - नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(यु.पी. कुलकर्णी)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दि.०९.०६.२०२३